# श्री. हरिभाऊ चैतराम भनारकर

सेवक क्र. ४०९ बुधवारी, टी.बी. दवाखान्याजवळ, नागपूर

आम्ही या मार्गावर येण्याचे कारण की, आमच्या मोठ्या आईच्या पायाला फॅक्चर झाले होते. पायाला वेट देण्याकरिता तिला मेयो हॉस्पीटलमध्ये भरती केले होते. पोटरीच्या हाडात छिद्र करुन पायाला वेट दिले. तो घाव पुष्कळ दिवस बरा झाला नाही. दोन तीन डॉक्टरांकडून औषधोपचार केला. तात्पुरता आराम पडत असे व नंतर पुनः जसेच्या तसे होत असे. माझ्या पत्नीला नेहमी आठ महिन्यांचेच मुल होई. ते वाचत नसे. मी एका खाजगी दुकानात नोरीला आहे. मला एक नवीनच व्याधी झाली. माझा जीव केव्हाही भयंकर घाबरत असे. त्यामुळे मी अत्यंत अस्वस्थ होऊन जात असे. एक दिवस दुकानाच्या कामासाठी बँकेत गेलो असताना तेथेच माझा जीव घाबरु लागला. बँकेच्या एका कर्मचाऱ्याने मालकाला बोलावले. त्यांनी बँकेचे काम पूर्ण केले आणि मी रिक्षाने घरी परत आलो. त्यानंतर मी याकरिता दोन वैद्यांचे व डॉक्टरांचे बरेच दिवस औषघ घेतले. तात्पुरता आराम होई व पुनः जसेच्या तसेच होत असे. त्यामुळे मी फार त्रासून गेलो. मी मोठ्या वडिलांना म्हणजे श्री. महादेवराव नळवाले यांना बोलाविले. मी त्यांना या मार्गाविषयी माहिती विचारली. त्यांच्याकडून या मार्गाविषयी संपूर्ण माहिती मिळाल दयानंतर आम्ही या मार्गाचा स्वीकार करण्याचा निश्चय केला. नंतर मोठ्या वडिलांना घेऊन आम्ही कुटुंबातील सर्व लोक(मोठे वडील, दोन आई, पत्नी व मुले) बाबांकडे गेलो. त्यांना आमचा हा मार्ग स्वीकारण्याची इच्छा सांगितली. बाबांनी आम्हाला अगोदर अकरा दिवसांची व नंतर बेचाळीस दिवसांची साधना दिली. बेचाळीस दिवसांच्या साधनेने आम्हाला पूर्णपणे समाधान मिळाले. याप्रमाणे आम्ही या मार्गाचे अनुयायी झालो.

* * * * *